ePaper
उद्धव ठाकरेंसाठी एनडीएचे दरवाजे खुले आहेत? गृहमंत्री अमित शाह

| वर्ष - 7 | अंक - 282 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- मुंबई - बडोदाचा सामना अनिर्णीत
- आर्टिकल ३७०'च्या कमाईत घट
- ठाकरेंसाठी एनडीएचे दरवाजे खुले?
- संकल्पात स्मारकांसाठी भरीव तरतूद

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 28 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अनधिकृत बांधकाम 'जमीनदोस्त'!

## महापालिका प्रशासन आक्रमक : दोन लाखहून अधिक क्षेत्र निष्कसीत



| पिंपरी चिंचवड | | महाईन्यूज

**महापालिका कार्यक्षेत्रात आज मोठ्या प्रमाणात अतिक्रमण कारवाई करण्यात येऊन पत्राशेड व बांधकामे अशी एकूण २ लाख ३२ हजार चौरस फुट क्षेत्र निष्कासणाची कारवाई करण्यात आली असून ही कारवाई यापुढेही चालू राहणार असल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शहर अभियंता मकरंद निकम यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई करण्यात आली.**



ड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नाशिक फाटा उड्डाणपूल ते साई चौक जगताप डेअरी या मर्गलागतच्या अनधिकृत पत्राशेड व बांधकामावर कारवाई करण्यात आली सुमारे १ लाख २ हजार चौरस फुट क्षेत्राचे पत्राशेड पाडण्यात आले.

तर क कार्यक्षेत्रालगतच्या १ लाख ३० हजार चौरस फुट अतिक्रमण कारवाई करण्यात आली. सदरची कारवाई अ, ब, क, ड, इ, फ, ग, ह या आठही क्षेत्रीय कार्यालयांकडील टीम मार्फत कारवाई करण्यात आली. या कारवाईत उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रिय अधिकारी अंकुश जाधव,अमित पंडित, अजिंक्य येळे, सुचिता पानसरे, ५ उपअभियंता ५ कनिष्ठ अभियंता,२४ बीट निरीक्षक,अतिक्रमण विभागाकडील एक पोलिस अधिकारी,५ पोलिस,३ महिला पोलिस,८० एम एस एफ जवान,सांगवी पोलीस स्टेशन कडील ५ पोलीस,३ महिला पोलीस,५ जे सी बी,२ कटर तसेच ३० मजूर सहभागी झाले होते., तर प्रभाग क्र.०२ मधील कुदळवाडी, चिखली ३० मीटर डी.पी. रस्त्यामधील सुमारे ३२ हजार २८० चौरस फुट क्षेत्रातील ०३ आर.सी. सी. बांधकामे तसेच सुमारे ९७ हजार ८४० चौरस फुट क्षेत्रामधील ०७ वीट बांधकामांसह १५ पत्राशेड अशी एकूण १ लाख ३० हजार चौरस फुट क्षेत्रावर अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

### अतिक्रमण कारवाई सर्वच प्रभागात यापुढेही चालू राहणार!

दररोज शहराच्या विविध भागात अतिक्रमण कारवाई केली जात आहे.नागरिकांनी रस्त्यांवर बेवारस वाहने उभी करुन नये. तसेच अनधिकृत टपऱ्या,पत्राशेड, बॅनर्स उभारु नये.तसेच फुटपाथ स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे.महापालिका क्षेत्रात प्रशासनाची परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम करु नये,असे आवाहन क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना केले आहे.तसेच महापालिकेमार्फत अतिक्रमण कारवाई सर्वच प्रभागात यापुढेही चालू राहणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली आहे.

# पवना नदीकाठीछट पूजेसाठी अतिरिक्त जागा उपलब्ध करून द्या

## राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची महापालिका आयुक्तांना सूचना

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड येथील पवना नदीकाठी मोठ्या संख्येने उत्तर भारतीय समाज छट पूजा करू शकेल, एवढी जागा वर्षात केवळ दोन दिवसांसाठी (प्रत्येक वर्षी नोव्हेंबरमध्ये) उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी हनुमान मित्र मंडळ आणि छट पूजा समितीचे कार्याध्यक्ष विजय गुप्ता यांनी नुकतीच राज्याच्या विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना केली आहे.**





निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहरात अडीच लाख उत्तर भारतीय नागरिक वास्तव्य करीत आहेत. उत्तर भारतीय समाजाचे शहरातील विकासात मोठे योगदान आहे. समाजाचा धार्मिक कार्यक्रम " छट पूजा " हा सण इंद्रायणी आणि पवना नदीकाठी गेली ३० वर्षापासून नियमितपणे दरवर्षी उत्साहात साजरा केला जातो. पिंपरी चिंचवड महापालिकेकडून चिंचवड परिसरात पवना नदीकाठी उत्सवासाठी तात्पुरती व्यवस्था केली जाते.

### शहराच्या वैभवातदेखील भर पडू शकेल

चिंचवड आणि पिंपरी मतदार संघातील मोहननगर, दळवीनगर, चिंचवड, काळभोरनगर परिसरातील हजारोंच्या संख्येने भक्त, भाविक या घाटावर छटपूजेला येतात. अपुऱ्या जागेमुळे वादविवाद होतो. शिवाय गर्दी होते. अपुऱ्या जागेमुळे अपघाताचीही शक्यता बळावते. या घाटाच्या अगदी उजव्या बाजूला शासनाची मोकळी पडीक जागा आहे. त्या जागेवर महापालिकेने नवा घाट विकसित करावा. शिवाय येथे नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक आणि पर्यटन स्थळही विकसित करता येऊ शकेल. या प्रकल्पाच्या उभारणीमुळे शहराच्या वैभवातदेखील भर पडू शकेल. त्यामुळे आपण मागणीचा विचार करून चिंचवडगावातील हॉटेल रिव्हरविव्ह जवळील पवना नदी घाटाला पर्याय म्हणून अगदी त्याच्या उजव्या बाजूला नवीन घाट उभारणीच्या कामाला त्वरित मंजुरी द्यावी, असे या निवेदनात विजय गुप्ता यांनी म्हटले आहे.

# सुप्रिया सुळेंसाठी शरद पवार मैदानात!

## » लोकांना भाजप विरोधात पर्याय हवा आहे : शरद पवार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर प्रतिष्ठेच्या झालेल्या बारामती लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघाचा आढावा शरद पवार यांनी मंगळवारी घेतला. सहाही विधानसभा मतदारसंघातील प्रश्न पवार यांनी जाणून घेतले. सकाळी दहा वाजता सुरू झालेले बैठकांचे सत्र सायंकाळी सात वाजता संपले. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट विकासासाठी नाही.**




काळ कठीण असला तरी तो पुढे सोपा होईल त्यासाठी एकजूटीने काम करा, असा सल्ला पवार यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना दिला.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर बारामती लोकसभा मतदारसंघ चर्चेत आला आहे. विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा या निवडणुकीच्या रिंगणात उभे राहण्याची शक्यता आहे. बारामतीमधील राजकीय वातावरण तापण्यास सुरूवात झाली असतानाच पवार यांनी भोर- वेल्हा- मुळशी, इंदापूर, खडकवासला, पुरंदर, बारामती आणि दौंड या बारामती लोकसभा मतदारसंघाअंतर्गत येत असलेल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला. खासदार सुप्रिया सुळे, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यावेळी उपस्थित होते.प्रत्येक विधानसभा निहाय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांबरोबर पवार यांनी चर्चा केली. स्थानिक समस्या जाणून घेत मार्गदर्शन केले. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुट विकासासाठी झालेली नाही. आगामी काळात एकत्रित काम करावे लागेल. प्रत्येक मतदारसंघात कमीत कमी दीडशे ते दोनशे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि विविध संस्थांचे पदाधिकारी एकत्रित आहेत. लोकांना भाजप विरोधात पर्याय हवा आहे. त्यामुळे ती पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, असे पवार यांनी सांगितले या सर्व घडामोडी दरम्यान लोकसभा निवडणुकीला काहीच दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला असताना अजित पवार, सुनेत्रा पवार हे बारामती लोकसभा मतदारसंघातील अनेक भागात दौरे आणि मेळावे घेत आहेत. यामुळे सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार असे जवळपास निश्चित मानले जात आहे. यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून त्या पार्श्वभूमीवर बारामती लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या विधानसभा मतदार संघनिहाय पुण्यातील मार्केटयार्ड येथील निसर्ग मंगल कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीला सुरुवात झाली आहे. तर या बैठकीला खासदार सुप्रिया सुळे या देखील उपस्थित आहेत. त्याच दरम्यान मनसेचे नेते वसंत मोरे यांनी शरद पवार यांची भेट घेतली.त्या भेटीनंतर वसंत मोरे म्हणाले की, कात्रज डेअरीच्या मागील बाजूस असलेल्या जागेत पुणे महापालिका आयुक्तांमार्फत चुकीचे आरक्षण टाकण्यात आले आहे. त्या संदर्भात सह्यांची मोहीम हाती घेऊन नागरिकांमध्ये प्रबोधन केले जात आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देखील हा प्रश्न मांडला. पण काही मार्ग निघाला नाही.

### समस्या जाणून घेत मार्गदर्शन केले

» विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा या निवडणुकीच्या रिंगणात उभे राहण्याची शक्यता आहे. बारामतीमधील राजकीय वातावरण तापण्यास सुरूवात झाली असतानाच पवार यांनी भोर- वेल्हा- मुळशी, इंदापूर, खडकवासला, पुरंदर, बारामती आणि दौंड या बारामती लोकसभा मतदारसंघाअंतर्गत येत असलेल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला. खासदार सुप्रिया सुळे, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यावेळी उपस्थित होते.प्रत्येक विधानसभा निहाय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांबरोबर पवार यांनी चर्चा केली. स्थानिक समस्या जाणून घेत मार्गदर्शन केले.

# पुणे शहर आणि जिल्ह्यांतील आरोग्य सुविधांमध्ये वाढ होणार

## » पुण्यात 'एम्स' उभे राहणार! अजित पवारांची मोठी घोषणा

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नागपूरमधील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या (एम्स) धर्तीवर एम्सची उभारणी करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी अर्थसंकल्पात केली. या प्रकरणी लवकरच राज्य सरकारकडून केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला जाणार आहे.**



औंध येथील जिल्हा रुग्णालयाच्या परिसरामध्ये आरोग्य विभागाची सुमारे ८५ एकर जागा आहे. या जागेत एम्स उभारण्याचे नियोजन आहे. एम्सची उभारणी झाल्यास पुणे शहर आणि जिल्ह्यांतील आरोग्य सुविधांमध्ये वाढ होणार आहे. याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांनाही एम्सचा फायदा होणार आहे. एम्सची उभारणी करण्यासाठी राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाकडून लवकरच केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही सुरू होणार असून, जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयांवर मोठा ताण आहे. लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणात सरकारी रुग्णालयांची क्षमता अपुरी पडत आहे. ग्रामीण भागातील आणि महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये सुविधा उपलब्ध नसल्याने ससून सर्वोपचार रुग्णालयात मोठ्या प्रमाणात रुग्ण धाव घेतात. त्यामुळे या रुग्णालयावरील ताण वाढत आहे. त्यातच पश्चिम महाराष्ट्रातील हे सर्वांत मोठे सरकारी रुग्णालय असल्याने तेथील रुग्णही ससूनमध्ये येतात. औंधमध्ये एम्स सुरू झाल्यास ससूनवरील ताण कमी होऊन रुग्णांना अधिक चांगली आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे.लोकसंख्येच्या तुलनेत सरकारी रुग्णालयांमधील अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या कमी आहे. अतिदक्षता विभागातील खाटांचा विचार करता ससून रुग्णालय ११३, महापालिकेचे कमला नेहरू रुग्णालय १७ आणि जिल्हा रुग्णालय १५ अशी क्षमता आहे. यामुळे अनेकवेळा रुग्णांना अतिदक्षता विभागात दाखल करता येत नाही.

एम्समुळे अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या वाढेल आणि इतर रुग्णालयांवरील ताण कमी होईल.एम्सची उभारणी झाल्यास पुणे शहर आणि जिल्ह्यांतील आरोग्य सुविधांमध्ये वाढ होणार आहे. याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांनाही एम्सचा फायदा होणार आहे.

एम्सची उभारणी करण्यासाठी राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाकडून लवकरच केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही सुरू होणार असून, जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

> “ पुण्यातील औंध येथे एम्सची उभारणी करण्याबाबत राज्य सरकारच्या पातळीवर चर्चा सुरू होती. याबाबतचा प्रस्ताव लवकरच राज्य सरकारकडून केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार आहे. याचबरोबर सरकारकडून एम्ससाठी जागाही उपलब्ध करून दिली जाईल.
>
> – **दिनेश वाघमारे**, प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग

# विलास लांडे यांची "हनुमान उडी"!

## शिरूर लोकसभा लढवणार : शरद पवार की अजित पवार पत्ता गुलदस्त्यात!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकत्रीत राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये उभी फुट पडून दोन राष्ट्रवादी कॉंग्रेस झाल्यांनतर जेष्ठ नेते शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मानणाऱ्या पुणे जिल्ह्यातील नेत्यांमध्ये उभी फूट पडली. या धामधुमती जिल्ह्यातील काही नेते दोन्ही नेत्यांच्या संपर्कात राहत आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये काल सोमवारी (ता. २६) झालेल्या एका कार्यक्रमात शरद पवार यांनी माजी आमदार विलास लांडे यांच्याबाबत 'आता खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना पाठीराखा मिळाला', अशी 'गुगली' टाकली. त्यामुळे विलास लांडे नक्की कुठे? या चर्चेला जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मंगळवारी (ता. २७) उधान आले.**



राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये उभी फुट पडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सवता सुभा केला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व चिन्ह अजित पवार यांना दिले. तर; राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार या वेगळा पक्ष व तुतारी फुंकणारा माणूस हे चिन्ह जेष्ठ नेते शरद पवार यांना मिळाले. मात्र; जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये विभागणी झाली.

शहरातील बहुतांश विकास कामे अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली झाली म्हणून कार्यकर्त्यांच्या दबावामुळे सुरवातीला विलास लांडे यांचे चिरंजीव माजी नगरसेवक विक्रांत लांडे व पुतणे विराज लांडे यांच्यासोबत विलास लांडेही अजित पवार यांच्या पाठीमागेच उभे राहिले.

माजी खासदार गजानन बाबर यांच्यावरील 'संघर्षयात्री' पुस्तकाचे प्रकाशन शरद पवार व शिवसेनेचे नेते, खासदार संजय राऊत यांच्या हस्ते चिंचवड येथे प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झाले. यावेळी बोलताना विलास लांडे म्हणाले, 'शरद पवार यांचा फोटो माझ्या वडीलांनी घरातील देवघरात ठेवला होता, ते त्याची पुजा करायचे. शरद पवार यांच्या आशीर्वादामुळे माझी कारखाना उभी राहिली. आज त्या कारखान्यात तीन हजार कामगार आहेत.'

यावर बोलताना शरद पवार म्हणाले, 'माजी आमदार विलास लांडे यांनी आपल्या कारखान्यात तीन हजार कामगार कार्यरत असल्याचे आता सांगितले. हे ऐकून माझ्या डोक्यावरचे ओझे उतरले. आता निवडणूक आली आहे. उद्या निवडणुकीला पाठीराखा पाहिजे, असा विचार मी करत होतो. मात्र; विलासराव यांच्यासारखा जबरदस्त व शक्तीशाली पाठीराखा मला दिसत आहे. हा खुलासा केल्याबद्दल त्यांचे धन्यवाद.'

> आपण अजित पवार यांच्याशी बोलूनच निर्णय घेणार आहेत. मी शिरुर लोकसभा मतदारसंघासाठी इच्छूक आहे. मला उमेदवारी द्यावी, अशी मागणी आहे. अजित पवार देतील तो निर्णय मला मान्य आहे. **-विलास लांडे, माजी आमदार**

### चर्चेस कारण की...

**» पवार यांच्या कार्यक्रमातील वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात 'लांडे नेमके कुठे शरद पवार यांच्याकडे की अजित पवार यांच्याकडे' याबाबत चर्चा सुरु झाली. मागील महिना पूर्वी विलास लांडे यांचे जावई सुधीर मुंगसे यांनी चऱ्होली (खुर्द) येथे बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. यावेळी शरद पवार यांच्या समवेत विलास लांडे व्यासपीठावर होते. त्यापूर्वीही चऱ्होलीतील वारकरी सांप्रदयाच्या कार्यक्रमालाही ते शरद पवार यांच्यासोबत व्यासपीठावर होते. तर; थोड्या दिवसांपूर्वी झालेल्या अजित पवार यांच्या मेळाव्यालाही ते अजित पवार यांच्या समवेत व्यासपीठावर होते.**

### शिरुरला उमेदवारीसाठी रस्सीखेच...

» शिरुर लोकसभेचे विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची उमेदवारी महाविकास आघाडीतर्फे शरद पवार यांनी निश्चित केली आहे. तशी घोषणाही प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जाहिररित्या केली आहे. तर; महायुतीकडून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आपण पुन्हा रिंगणात असल्याचे नुकतेच पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितले. महायुतीकडून जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर, माजी आमदार विलास लांडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रदीप कंद यांच्या नावांचीही चर्चा आहे. अन्य पक्षातून आलेल्यांना उमेदवारी देऊ नये, असे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटातील काही कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. मात्र; ही जागा महायुतीत कोणत्या पक्षाकडे जाते ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

---

# प्रॉपर्टी टॅक्स भरणाऱ्या करदात्यांना पर्सनल अपघात पॉलिसी लागू करा

## संजोग वाघेरे पाटील यांचे महापालिका आयुक्तांना निवेदन

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात लाखो नागरिक प्रामाणिकपणे दरवर्षी प्रॉपर्टी टॅक्स भरून शहराच्या विकासात योगदान देतात. अशा प्रामाणिक करदात्यांसाठी आणि नवीन करदात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पर्सनल अपघात पॉलिसी लागू करावी, अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.**





या संदर्भात संजोग वाघेरे पाटील यांनी आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यांनी त्यात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी नागरिकांकडून विविध कर आकारणी केली जाते. शहरांमध्ये अनेक मालमत्ता कर आकारला जातो, परंतु नागरिक नियमित मालमत्ता कर भरत नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेचे अनेक वर्षे कर रूपाने पैसे वेळेत जमा होत नाहीत. तसेच महानगरपालिका हद्दीमध्ये अनेक ठिकाणी नवीन समाविष्ट गावांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात नवीन बांधकामे, इमारती, व्यावसायिक इमारती तयार होत आहेत. या नव्याने होणाऱ्या मालमत्तेचा कर वेळेत भरणे कामी प्रोत्साहन म्हणून पर्सनल अपघात पॉलिसी योजना (५,०००००/-) पाच लाख रुपया पर्यंत महानगरपालिके मार्फत राबवली जावी. या योजनेचा लाभ हा महापालिका प्रशासन व शहरातील कर भरणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीने हिताचा असून सदरील योजनेतून महापालिका प्रशासनाला प्रशासनाचा कर गोळा होण्यासाठी व संबंधित कर भरणाऱ्या नागरिकांना आकस्मित, अपरिहार्य घटनेत आर्थिक स्थर्य मिळविण्यासाठी लाभदायक ठरणार आहे, असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

> कराचा भरणा करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनामार्फत कारवाई केली जाते. परंतु प्रामाणिकपणे कर भरणा-या नागरिकांना प्रोत्साहन देण्याकरिता महानगरपालिका काही ठोस उपाययोजना करत नाही. त्यासाठी दरवर्षी प्रॉपर्टी टॅक्स भरून शहराच्या विकासात योगदान देणा-या करदात्यांसाठी पर्सनल अपघात पॉलिसी लागू करावी. या पॉलिसीचा करदात्या नागरिकांना लाभ होईल आणि महानगरपालिकेच्या उत्पन्नात देखील भर पडेल.
> **– संजोग वाघेरे पाटील,**
> मावळ लोकसभा संघटक, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)



भूमिका

# दळणवळणातून विकासाला 'गतिशक्ती'

**अर्थव्यवस्था अधिकाधिक मजबूत करण्यात दळणवळण क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या क्षेत्रात कार्यक्षम, शाश्वत आणि किफायतशीर पर्याय निर्माण करणे ही काळाची गरज आहे. 'पीएम गतिशक्ती योजना' आणि 'राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण' ही त्या दिशेने टाकलेली पावले आहेत..**

भारत ही २०२५ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था व्हावी, हे उद्दिष्ट गाठण्यासाठी अलीकडच्या वर्षांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण आणि सुसंगत पावले उचलली गेली आहेत. यामधील दळणवळण क्षेत्राची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका ओळखून केंद्र सरकारने आर्थिक विस्ताराला आधार देण्यासह, व्यापारउदिमातील स्पर्धात्मकतेला चालना देण्यासाठी आणि देशभरात पुरवठा साखळी सुरळीत करण्याच्या उद्देशाने दळणवळण क्षेत्रातील पायाभूत सुविधा वाढवण्यावर भर दिला आहे. गुंतवणुकीच्या प्रयत्नांना जोखीममुक्त करण्याबरोबरच, भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करून नागरिकांचे राहणीमान सुलभ करणे आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेला चैतन्य देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. गुंतवणुकीच्या जगात गुंतवणूकदारांना नियोजन, अंमलबजावणी, वित्तपुरवठा, प्रशासकीय प्रक्रिया, राजकीय स्थिती, भूसंपादनातील आव्हाने आणि बाजारातील चढउतार



अशा निरनिराळ्या आघाड्यांवर अनेक जोखमींचे सूक्ष्म मूल्यांकन करावे लागते. माहितीपूर्ण निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नैपुण्य प्राप्त करणे, असंख्य विचारांना एका सुसंगत धोरणात गुंफणे, गुंतवणूक अनुकूल परिस्थिती निर्माण करणे, त्यासाठी मौल्यवान संसाधनांचा योग्य वापर करणे आवश्यक असते. असे असले तरी अशा प्रकारच्या क्षेत्रांमध्ये एखाद्या प्रकल्पाच्या संपूर्ण कार्यकाळातील जोखमीचे व्यापक स्तरावरील मूल्यांकन कमी होण्याचे आव्हान कायम असते. संपूर्ण जगभरातील देशांच्या सरकारांनी या प्रयत्नांची निकड ओळखली असून गुंतवणूक परिदृश्य जोखीममुक्त करण्याच्या उद्देशाने सक्रियपणे धोरणे राबविली जात आहेत. या दिशेने होत असलेल्या प्रयत्नांमध्ये व्यापारासाठी पोषक वातावरण निर्मिती, धोरणात्मक आणि आर्थिक स्थैर्य राखणे, दळणवळणास प्रोत्साहन देणे, नियमांची चौकट अधिक सोपी करणे, सार्वजनिक-खासगी भागीदारीला चालना देणे आणि आकर्षक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे या गोष्टींचा समावेश आहे.

पायाभूत सेवा क्षेत्र हे वाढत्या अर्थव्यवस्थेचे सार मानले जाते. गुंतवणुकीसाठी ते एक आदर्श क्षेत्र मानले जाते. आर्थिक वृद्धी आणि विकास साध्य करणाऱ्या राष्ट्रांसाठी गुंतवणुकीला चालना देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारने देशातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एक परिवर्तनात्मक दृष्टिकोन म्हणून पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा उपक्रम सुरू केला आहे. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आणि संपूर्ण भारतात संपर्कयंत्रणा मजबूत करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब करणे हे या उपक्रमाचे उद्देश आहेत. या परिवर्तनाला चालना देणारा आणखी एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे, राष्ट्रीय लॉजिस्टिक्स योजना. हे दोन्ही उपक्रम एकत्रितरीत्या भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातील प्रदीर्घ आव्हानांवर तोडगा काढण्यावर आणि क्षमतांचा पुरेपूर वापर करण्यावर भर देतात.ऑक्टोबर २०२१ मध्ये उद्‌घाटन झालेल्या पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा (एनएमपी) या उपक्रमाद्वारे रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ आणि अंतर्गत जलवाहतुकीचा समावेश असलेल्या भारताच्या पायाभूत सेवांच्या जाळ्याला आधुनिक स्वरूप देऊन एकत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून डिजिटल तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून प्रवासी आणि मालाची सुरळीत वाहतूक करणे, संपर्कयंत्रणा सुधारणे आणि वाहतुकीचा खर्च कमी करणे यावर भर दिला जात आहे. बहु-पर्यायी लॉजिस्टिक केंद्र आणि कॉरिडॉरच्या विकासाला प्राधान्य देऊन,.म्हणजे शेवटच्या घटकापर्यंतची संपर्कयंत्रणा सुधारणे आणि पायाभूत सुविधांमधील अडथळे दूर करणे. त्यासाठी रस्ते रुंदीकरण, रेल्वेचे विद्युतीकरण आणि बंदरांचे आधुनिकीकरण यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यात येत आहे.

## संपादकीय »

### करेक्ट कार्यक्रम!

***बुद्धिवानांचा, दुसऱ्या फळीचा तसेच उत्तम चर्चकांचा पाठिंबा नसेल तर व्यवस्था आंदोलकांस दमवते आणि अखेर स्वत:ला हवे तितकेच करते...***

मागणी कोणतीही असो; तिच्या पूर्ततेसाठी आंदोलन सुरू करण्यास धारिष्ट्य लागते हे खरेच. परंतु ते थांबवण्यासाठी धारिष्ट्याच्या जोडीला शहाणपणही लागते. त्याच्या पुरेशा मात्रेअभावी काय होते हे मनोज जरांगे यांचे जे झाले त्यावरून लक्षात घेता येईल. खरे तर जरांगे निष्णात उपोषणकार! साधारण दीडेक डझन उपोषणांचा अनुभव त्यांच्या गाठीशी असावा. तेव्हा स्वत:च्या आधीच्या उपोषणांची सांगता कशी झाली, ती उपोषणे यशस्वी ठरली म्हणजे काय, त्यांच्या यशाचे काय झाले आदी प्रश्नांचा विचार जरांगे वा त्यांच्या सल्लागारांनी केला असता तर आता जे काही झाले ते झाले नसते.स्वानुभवातून जाणून घेणे त्यांस मंजूर नसणे शक्य आहे. स्वत:चे कटु अनुभव कोण पुन्हा आठवणार. ही त्यांची भावना समजून घेता येण्यासारखीच. त्यांनी अण्णा हजारे यांच्या आंदोलनांचे स्मरण केले असते तरी चालले असते.

सध्याच्या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची मुख्य मागणी किमान आधारभूत किंमतीला वैधानिक अधिष्ठान देण्याची आहे. स्वामिनाथन आयोगानेच त्याची शिफारस केली होती. ती व्यवहार्य कशी आहे, याविषयीचे विवेचन. केंद्र सरकारने २०२१मध्ये तीन कृषी कायदे मागे घेतले.

# स्वामिनाथन 'एमएसपी' शेतकऱ्यांना लाभदायी

त्यानंतर आता पुन्हा हजारो शेतकरी सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) कायदेशीर व्हावी आणि प्रा. स्वामिनाथन समितीने मांडलेल्या सूत्रांच्या शिफारशींची अंमलबजावणी व्हावी या मागण्यांसाठी देशाच्या राजधानीकडे जात आहेत.याखेरीज, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, निवृत्तीवेतन योजना तसेच वीज दुरुस्ती विधेयक-२०२० मागे घ्यावे, याही शेतकऱ्यांच्या अपेक्षा आहेत. शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे प्राथमिक उद्दिष्ट स्वामिनाथन समितीच्या शिफारशीनुसार 'एमएसपी' मिळवणे आहे. प्रा.स्वामिनाथन समितीने २००६ मध्ये या शिफारशी मांडल्या. त्यानुसार शेतकऱ्यांना सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमतींची हमी देणारे कायदे व्हायला हवे आहेत. आतापर्यंत सरकारने २३ पिकांसाठी 'एमएसपी' देऊ केली आहे, परंतु तशी कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. 'एमएसपी' ही रक्कम सरकारतर्फे शेतकऱ्यांना त्यांनी



पिकवलेल्या पिकांसाठी देण्यात येते. बाजारपेठेतील अस्थिरतेच्या काळात किंवा बाजारातील किमती किमान आधारभूत किमतीच्याही खाली गेल्यानंतर ही किंमत शेतकऱ्यांसाठी सहाय्यक ठरते.सरकारकडून ज्या तेरा खरीप पिकांना 'एमएसपी' दिली जाते त्यात भुईमूग, कापूस, सोयाबीन, तांदूळ, नाचणी, मूग, उडीद, कापूस, सूर्यफूल आणि तीळ यांचा समावेश आहे. सात रब्बी पिके- गहू, बार्ली, हरभरा, मोहरी, करडई आणि तोरिया- यांना अतिरिक्त 'एमएसपी' घोषित करण्यात आली आहे. सध्या सरकार 'एमएसपी' ठरवण्यासाठी ए २+ कौटुंबिक श्रम +५० टक्के अधिक मूल्य सूत्रानुसार निर्णय घेते.

'ए २'मध्ये शेतकऱ्यांनी भाड्याने घेतलेले मजूर व जनावरे, भाड्याची यंत्रसामग्री, बियाणे, कीटकनाशके, खते, अवजारांचे अवमूल्यन, सिंचनशुल्क आणि खेळत्या भांडवलावरील व्याज यांचा समावेश होतो. या घटकांव्यतिरिक्त इतर पिकांची किंमत, अर्थव्यवस्थेची स्थिती आणि कृषी व बिगरकृषी क्षेत्रांमधील व्यापाराच्या अटींचाही सरकार विचार करते.स्वामिनाथन समितीच्या सूचनेनुसार, सरकारने 'एमएसपी' ठरवण्यासाठी सी २+ ५०टक्के अधिक मूल्य याचा विचार करणे अपेक्षित आहे. 'सी २'मध्ये 'ए २'बरोबरच अन्य चार महत्त्वाचे खर्च समाविष्ट आहेत. प्रथम, मालकीच्या स्थिर भांडवली मालमत्तेच्या मूल्यावरील व्याज (जमीन वगळून); दुसरे, मालकीच्या जमिनीचे भाडेमूल्य व भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीसाठीचे भाडे; तिसरे, कौटुंबिक श्रमांचे आरोपित मूल्य आणि चौथे, एकूण खर्चाच्या दहा टक्के व्यवस्थापनसामग्रीचे मूल्य.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# संकल्पात स्मारकांसाठी भरीव तरतूद!

## चार महिन्यांच्या खर्चाचे लेखानुदान विधानसभेत सादर

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**अयोध्येत महाराष्ट्र भवनाची उभारणीसह देवस्थाने-स्मारकांच्या विकासासाठी भरीव तरतूद असलेले लेखानुदान राज्याचे उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी सादर केले. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मांडण्यात आलेल्या या लेखानुदानात दुर्बल घटकांसह विविध समाजाच्या नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण घोषणा करत राज्य सरकारने मतदारांप्रती 'भक्तीभाव' व्यक्त केला. मात्र, हे करत असताना लेखानुदानात एक लाख कोटींची राजकोषीय तर ९,७३४ कोटींच्या महसुली तूट दाखविण्यात आल्याने येत्या काळात राज्याची आर्थिक स्थिती सावरण्याचे मुख्य आव्हान सरकारसमोर आहे.**




उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी राज्याचे चार महिन्यांच्या खर्चाचे लेखानुदान मंगळवारी विधानसभेत सादर केले. यात लोकप्रिय घोषणा करण्याचे महायुती सरकारने टाळले असले तरी, मतांची पेरणी करण्याचे पुरेपूर प्रयत्नही केले आहेत.

भाजपसाठी महत्त्वाचा प्रचार मुद्दा असलेल्या अयोध्येतील राममंदिराचे प्रतिबिंब लेखानुदानातही उमटले आहे. श्रीरामदर्शनासाठी राज्यातून जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसुविधांसाठी अयोध्येत महाराष्ट्र भवन उभारण्याची घोषणा अजित पवार यांनी केली. याच धर्तीवर श्रीनगर येथेही महाराष्ट्र भवन उभारण्यात येणार आहे.आदिवासी, मराठा, ओबीसी आदींसाठी असलेल्या संस्थांना अनुदान, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व प्रशिक्षण यासह अन्य कार्यक्रमांमध्ये एकसमानता आणण्यासाठी सर्वंकष धोरण निश्चित करण्याचे राज्य सरकारने जाहीर केले आहे. आगामी आर्थिक वर्षातील खर्चासाठी सहा लाख ५२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा वार्षिक योजनेसाठीच्या तरतुदीत २० टक्क्यांनी वाढ केली असून १८ हजार १६५ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. त्यातून आमदार, खासदार व अन्य लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार विकासकामे मार्गी लागतील. वार्षिक योजनेसाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये देण्यात येणार आहेत. त्यामध्ये अनुसूचित जातींच्या योजनांसाठी १५ हजार ८९३ कोटी रुपये, तर आदिवासी विकास योजनांसाठी १५ हजार ३६० कोटी रुपयांचा समावेश आहे.

५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करुन तेथे संकल्पना उद्यान, साहसी खेळ, मॉल, वॉटरपार्क आदी सुविधा निर्माण करण्याचे सुतोवाच लेखानुदानात करण्यात आले आहे. लोणार, अजिंठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर आणि कोकणातील सागरी किल्ल्यांच्या परिसरात पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा उभारण्यात येणार असून लोणावळा येथे ३३३ कोटी ५६ लाख रुपये खर्च करुन जागतिक दर्जाचा स्कायवॉक प्रकल्प उभारण्यात येणार आहे. वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती मंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत काशीबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, संत शिरोमणी गोरोबाकाका महाराष्ट्र मातीकला मंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ, पैलवान मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ यांना निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे अजित पवार यांनी जाहीर केले. धनगर समाजाच्या उन्नतीसाठी आदिवासी उपाययोजनाच्या धर्तीवर २२ योजना राबविण्याकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे. घरकूल योजना तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलरवर नेण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने निश्चित केले असून त्यादृष्टीने उद्योग, कृषी, पायाभूत सुविधा, वीज-पाणी, रस्ते आणि अन्य आवश्यक घटकांसाठी मोठ्या प्रमाणावर प्रकल्प व योजना हाती घेण्यात आल्या आहेत.

### 300 युनिट वीज मोफत

» फलटण-पंढरपूर, कांपा-चिमूर-वरोरा, जालना-जळगाव आणि नांदेड-बिदर या नवीन रेल्वे मार्गांकरिता एकूण खर्चाच्या ५० टक्के आर्थिक सहभाग राज्य सरकार उचलणार असून जालना-खामगाव, आदिलाबाद-माहूर-वाशिम, नांदेड-हिंगोली, मूर्तिजापूर-यवतमाळ शकुंतला रेल्वे आणि पुणे-लोणावळा मार्गिका ३ व ४ या रेल्वे मार्गांकरिता ५० टक्के आर्थिक भार राज्य सरकार उचलणार असल्याचे पवार यांनी सांगितले.मागेल त्याला सौर कृषीपंप : केंद्र शासनाच्या 'पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज' योजनेत घरांच्या छतांवर यंत्रणा बसविण्यासाठी ७८ हजार रुपये अनुदान आणि ३०० युनिट वीज मोफत मिळणार आहे.

# राष्ट्रवादी जरांगेंना बीडमधून लोकसभेची उमेदवारी देणार?

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठाविरोधी : शरद पवार

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कथित किर्तनकार अजय बारसकर आणि संगीता वानखेडे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे या आंदोलनामागे असल्याचा दावा वानखेडे यांनी केला आहे.**





त्याचबरोबर जरांगे पाटील यांनी आरोप केला आहे की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठाविरोधी आहेत. ते मराठा आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच फडणवीस मला विष देऊन अथवा इतर मार्गांनी ठार मारण्याचा प्रयत्न करत आहेत.मनोज जरांगे यांनी फडणवीस यांच्यावर आरोप केल्यानंतर सत्ताधारी पक्षांमधील काही नेत्यांनी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज (२७ फेब्रुवारी) मनोज जरांगे यांच्या मराठा आंदोलनाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही मागणी मान्य केली आहे. त्यामुळे राज्यातलं राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे.मनोज जरांगे पाटील हे शरद पवारांच्या पाठिंब्यानेच हे सगळं करत असल्याचे आरोप करत असताना भाजपाने शरद पवार आणि त्यांच्या पक्षाबद्दल आणखी एक दावा केला आहे. भाजपा नेते आशिष देशमुख यांनी दावा केला आहे की, बीड लोकसभा मतदारसंघातून जरांगे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याच्या तयारीत आहे. जरांगे यांना सुरुवातीपासूनच राजकीय महत्त्वकांक्षा होती, म्हणूनच त्यांनी मराठा आरक्षणासाठीचं आंदोलन उभं केलं आणि एवढे महिने लांबवलं. आजच्या महाविकास आघाडीच्या बैठकीत बीडची जागा मिळावी म्हणून पवार गट प्रयत्न करेल. ती जागा शरद पवार गटाला सुटल्यानंतर तिथे मनोज जरांगे यांना उमेदवारी दिली जाईल. भाजपाच्या या आरोपांना शरद पवार यांनी उत्तर दिलं आहे. शरद पवार यांनी काही वेळापूर्वी पुण्यात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मनोज जरांगे यांना बीडमधून उमेदवारी देणार आहे का? यावर शरद पवार म्हणाले.

### जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप

» "आता आमच्यावर अशी वेळ आली आहे का? हा दावा कोणी केलाय? देशमुखांचं नाव ऐकून पवार म्हणाले, हे खूप मर्यादित लोक आहेत. त्यांच्यबाद्दल काय बोलायचं.कथित किर्तनकार अजय बारसकर आणि संगीता वानखेडे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

# ठाकरेंसाठी एनडीएचे दरवाजे खुले?

## अमित शहा: निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपची देशभर मोर्चेबांधणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी देशभर मोर्चेबांधणी करत आहे. एका बाजूला इंडिया आघाडीतले पक्ष आपसात जागावाटप करण्यासंदर्भात चर्चा करण्यात व्यस्त आहेत. तर दुसऱ्या बाजूला भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांमध्ये विरोधी पक्षांमधून नेत्यांचं इनकमिंग चालू आहे. भाजपाप्रणित एनडीए प्रत्येक लोकसभा मतदारसंघ मजबूत करण्यावर लक्ष देत आहे. गेल्या काही महिन्यांत विरोधी पक्षांमधील अनेक नेत्यांनी भाजपात आणि त्यांच्या मित्रपक्षांमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे देशात एनडीएची ताकद वाढू लागली आहे. दोन महिन्यांपूर्वी बिहारमधील भाजपाचे जुने सहकारी नितीश कुमारही एनडीएत परतले आहेत. दोन आठवड्यांपूर्वी ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला आहे. दरम्यान, आता महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशी युती करणार का? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



संयुक्त शिवसेना आणि भारतीय जनता पार्टीची तीन दशकांहून अधिक काळ युती होती. उभय पक्षांच्या युतीने राज्यात अनेक वेळा सत्तास्थापन केली. भाजपाने केंद्रात स्थापन केलेल्या अनेक सरकारांमध्ये शिवसेनेला स्थान दिलं होतं. सध्या शिवसेनेचा शिंदे गट एनडीएचा सदस्य आहे. अशातच उद्धव ठाकरे यांची एनडीएत परतण्याची इच्छा असेल तर भाजपा त्यांचं स्वागत करेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उत्तर दिलं आहे. उद्धव ठाकरे (शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष) आणि भाजपाची जुनी मैत्री आहे. हे दोन मित्र पुन्हा एकत्र येतील का? यावर राजकीय विश्लेषक आणि प्रसारमाध्यमांकडून वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात असतात. अशातच या चर्चेवर अमित शाह यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान, टीव्ही ९ नेटवर्कच्या वार्षिक कॉन्क्लेव्हमध्ये अमित शाह बोलत असताना त्यांना उद्धव ठाकरेंबाबत प्रश्न विचारण्यात आलं. भाजपाने त्यांचा जुना सहकारी नितीश कुमार यांना एनडीएत घेतलं आहे. त्याचप्रमाणे एनडीए सोडून गेल्या उद्धव ठाकरेंची एनडीएत परतण्याची इच्छा असेल तर भाजपा त्यांचं स्वागत करेल का?

असा प्रश्न शाह यांना विचारण्यात आला. यावर शाह म्हणाले, या जर-तरच्या चर्चेला काहीच अर्थ नाही. तुम्ही असा प्रश्न मला विचारून तुम्हाला हेडलाईन मिळणार नाही. तुम्ही मला आगामी निवडणुकीबाबत प्रश्न विचारा. अन्यथा तुमची वेळ संपेल. शाह यांनी एकप्रकारे उद्धव ठाकरेंबाबतच्या प्रश्नावर उत्तर देणं टाळलं. बिहारमध्ये भाजपा आणि एनडीएने परत एकदा युती केली आहे. त्यामुळे बिहारच्या आगामी विधानसभा निवडणुकीत युतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असेल किंवा एनडीए बिहारमध्ये कोणाच्या नेतृत्वात निवडणूक लढेल असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. हाच प्रश्न अमित शाह यांनादेखील विचारण्यात आला. त्यावर गृहमंत्री म्हणाले, विधानसभा निवडणुकीला अद्याप वेळ आहे.

आत्ता आम्ही लोकसभा निवडणूक लढणार आहोत. त्यामुळे आत्ता तुम्ही लोकसभेबाबत बोला. विधानसभेच्या वेळी आम्ही दोन पक्ष एकत्र बसून सर्वकाही ठरवू. तुम्ही प्रसारमाध्यमांनी काही गोष्टी आमच्यावर सोडायला हव्यात. सगळं काही तुम्हीच ठरवणार का?दरम्यान, उद्धव ठाकरेंबाबतच्या प्रश्नावर अलीकडेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं होतं. फडणवीस म्हणाले होते, आमच्यातली सध्याची परिस्थिती अशी आहे की आमची मनं दुखावली आहेत.

उद्धव ठाकरे यांचा आमच्याबरोबर ज्याप्रकारचे व्यवहार राहिला आहे, ज्या प्रकारे खालच्या स्तरावर जाऊन ते सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करतात, या सगळ्या गोष्टींनी आमची मनं दुखावली गेली आहेत. जिथे मनं दुखावतात तिथे युती होत नाही. राजकीय मतभेद असतील तर ते दूर करून युती होते. परंतु, जिथे मनं दुरावलेली असतात, तिथे एकत्र येणं कठीण असतं आमची मनं दुरावली आहेत. यात शंका नाही.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी देशभर मोर्चेबांधणी करत आहे. एका बाजूला इंडिया आघाडीतले पक्ष आपसात जागावाटप करण्यासंदर्भात चर्चा करण्यात व्यस्त आहेत. तर दुसऱ्या बाजूला भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांमध्ये विरोधी पक्षांमधून नेत्यांचं इनकमिंग चालू आहे. भाजपाप्रणित एनडीए प्रत्येक लोकसभा मतदारसंघ मजबूत करण्यावर लक्ष देत आहे. गेल्या काही महिन्यांत विरोधी पक्षांमधील अनेक नेत्यांनी भाजपात आणि त्यांच्या मित्रपक्षांमध्ये प्रवेश केला आहे.

### दोन मित्र पुन्हा एकत्र येतील का?

» देशात एनडीएची ताकद वाढू लागली आहे. दोन महिन्यांपूर्वी बिहारमधील भाजपाचे जुने सहकारी नितीश कुमारही एनडीएत परतले आहेत. दोन आठवड्यांपूर्वी ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला आहे. दरम्यान, आता महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशी युती करणार का? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.संयुक्त शिवसेना आणि भारतीय जनता पार्टीची तीन दशकांहून अधिक काळ युती होती. उभय पक्षांच्या युतीने राज्यात अनेक वेळा सत्तास्थापन केली. भाजपाने केंद्रात स्थापन केलेल्या अनेक सरकारांमध्ये शिवसेनेला स्थान दिलं होतं. सध्या शिवसेनेचा शिंदे गट एनडीएचा सदस्य आहे. अशातच उद्धव ठाकरे यांची एनडीएत परतण्याची इच्छा असेल तर भाजपा त्यांचं स्वागत करेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अमित शाह यांनी उत्तर दिलं आहे.उद्धव ठाकरे आणि भाजपाची जुनी मैत्री आहे. हे दोन मित्र पुन्हा एकत्र येतील का? यावर राजकीय विश्लेषक आणि प्रसारमाध्यमांकडून वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात असतात.

# उत्तर प्रदेशमध्ये १० पैकी आठ जागांवर भाजपाचे उमेदवार

## 13 राज्यांतील जागांचा कार्यकाळ 2 एप्रिल रोजी संपणार आहे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भाजपाला राज्यसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात मोठा विजय मिळाला आहे. राज्यातल्या राज्यसभेच्या १० पैकी आठ जागांवर भाजपाने त्यांचे उमेदवार उभे केले होते. या निवडणुकीत भाजपाचे सर्व आठ उमेदवार जिंकले आहेत. तर समाजवादी पार्टीने त्यांचे तीन उमेदवार उभे केले होते. त्यापैकी एकाला पराभवाचा सामना करावा लागला आहे.**

समाजवादी पार्टीच्या काही आमदारांनी भाजपाच्या उमेदवाराला क्रॉस व्होटिंग केल्यामुळे सपाचा एक उमेदवार पडला आणि त्याच्याऐवजी भाजपाचा एक उमेदवार जिंकला आहे. या विजयाला भाजपाने 'अंतरात्म्याचा आवाज' म्हटलं आहे. राज्यसभा निवडणुकीत भाजपाचे उमेदवार अमरपाल मौर्य यांना ३६ मतं मिळाली आहेत. तर आरपीएन सिंह यांना ३४, साधना सिंह यांना ३४, संजय सेठ यांना २९, संगीता बलवंत बिंद यांना ३६, सुधाशं त्रिवेदींना ३८, तेजवीर सिंह यांना ३८ आणि नवीन जैन यांना ३४ मतं मिळाली आहेत. तर दुसऱ्या बाजूला सपा उमेदवार जया बच्चन यांना



४१, रामजी लाल सुमन यांना ३७ मतं मिळाली आहे. तर आलोक रंजन यांना १६ मतांसह पराभव स्वीकारावा लागला आहे. या निवडणुकीत सपा उमेदवार जया बच्चन यांना सर्वाधिक ४१ मतं मिळाली आहेत.उत्तर प्रदेशमधील समाजवादी पार्टीचे सात आमदार राकेश पांडेय, राकेश प्रताप सिंह, अभय सिंह, विनोद चतुर्वेदी, मनोज पांडेय, पूजा पाल आणि आशुतोष मौर्य यांनी एनडीएला मतदान केलं. ही मतं भाजपा उमेदवार संजय सेठ यांना मिळाली. त्यामुळे ते या निवडणुकीत जिंकू शकले. संजय सेठ २०१९ मध्ये समाजवादी पार्टीला रामराम करून भाजपात गेले होते.

### 41 जागांवर बिनविरोध निवडणूक

» दुसऱ्या बाजूला ओ. पी. राजभर यांचा पक्ष एसबीएसपीचे आमदार जगदीश राय यांनी क्रॉस व्होटिंग केलं. त्यांनी त्यांचं मत जया बच्चन यांच्या पारड्यात टाकलं.१३ राज्यांतील जागांचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी संपणार आहे. तर, उर्वरित दोन जागांचा कार्यकाळ ३ एप्रिल रोजी संपणार आहे. आंध्र प्रदेश ३, बिहार ६, छत्तीसगड १, महाराष्ट्र ६, तेलंगणा ३, उत्तर प्रदेश १०, उत्तराखंड १, पश्चिम बंगाल ५, ओडिसा २, राजस्थान ३ अशा एकूण ५६ जागा रिक्त आहेत. त्यापैकी आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, गुजरात, हरयाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, ओडिसा आणि राजस्थान अशा ४१ जागांवर बिनविरोध निवडणूक झाली आहे.

# पंचायत 2’ फेम अभिनेत्रीचा रस्ते अपघातात मृत्यू

भोजपुरी अभिनेत्री व ‘पंचायत २’ सीरिजमध्ये महत्त्वाची भूमिका साकारणाऱ्या आंचल तिवारीचा रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे. बिहारमधील कैमूर जिल्ह्यात रविवारी ( २५ फेब्रुवारी ) संध्याकाळी हा भीषण अपघात झाला. या अपघातात आंचलसह एकूण ९ जणांनी आपला जीव गमावला आहे. यामध्ये भोजपुरी इंडस्ट्रीमधील ४ नवोदित कलाकारांचा देखील समावेश होता. या घटनेमुळे संपूर्ण भोजपुरी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रक, एसयुव्ही गाडी आणि मोटारसायकल यांच्या धडकेत ९ जणांचा मृत्यू झाला आहे. बिहारमधील मोहनिया पोलीस स्टेशन हद्दीतील देवकाली गावाजवळ जीटी रोडवर ही घटना घडली. सोमवारी ( २६ फेब्रुवारी ) मृतांची ओळख पटली असून, यात भोजपुरी अभिनेत्री आंचल





तिवारी, छोटू पांडे, सिमरन श्रीवास्तव, प्रकाश राम, दधिबल सिंग, अनु पांडे, शशी पांडे, सत्य प्रकाश मिश्रा आणि बागीश पांडे यांचा समावेश आहे.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. एक्स पोस्ट शेअर करत त्यांनी घडल्या प्रकाराबद्दल दुःख व्यक्त केलं असून जखमींवर वेळीच उपचार करण्याच्या सूचना आरोग्य प्रशासनाला दिल्या आहेत.भोजपुरी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली असून अनेक कलाकार सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत दुःख व्यक्त करत आहेत. सध्या बिहार पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत.भोजपुरी अभिनेत्री व ‘पंचायत २’ सीरिजमध्ये महत्त्वाची भूमिका साकारणाऱ्या आंचल तिवारीचा रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे. बिहारमधील कैमूर जिल्ह्यात रविवारी ( २५ फेब्रुवारी ) संध्याकाळी हा भीषण अपघात झाला. या अपघातात आंचलसह एकूण ९ जणांनी आपला जीव गमावला आहे. यामध्ये भोजपुरी इंडस्ट्रीमधील ४ नवोदित कलाकारांचा देखील समावेश होता. या घटनेमुळे संपूर्ण भोजपुरी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रक, एसयुव्ही गाडी आणि मोटारसायकल यांच्या धडकेत ९ जणांचा मृत्यू झाला आहे. बिहारमधील मोहनिया पोलीस स्टेशन हद्दीतील देवकाली गावाजवळ जीटी रोडवर ही घटना घडली. सोमवारी ( २६ फेब्रुवारी ) मृतांची ओळख पटली असून, यात भोजपुरी अभिनेत्री आंचल तिवारी, छोटू पांडे, सिमरन श्रीवास्तव, प्रकाश राम, दधिबल सिंग, अनु पांडे, शशी पांडे, सत्य प्रकाश मिश्रा आणि बागीश पांडे यांचा समावेश आहे.

# सगळे ओटीटी प्लॅटफॉर्म्स तोट्यात



बॉलिवूडची क्वीन कंगना रणौत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा ‘इमर्जन्सी’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. प्रेक्षक कंगनाच्या या चित्रपटाची आतुरतेने वाट बघत आहेत. नुकतंच कंगनाने एका मुलाखतीदरम्यान ओटीटी प्लॅटफॉर्मबद्दल भाष्य केलं आहे. सध्याचे सगळेच ओटीटी प्लॅटफॉर्म हे अजिबात नफा कमवत नसून त्यांची अवस्था फारच बिकट असल्याचं कंगनाने सांगितलं आहे. ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे कलाकारांना एक नवा मंच मिळाला आहे जिथे प्रेक्षकांच्या वयाचं बंधन नाहीये. ओटीटी प्लॅटफॉर्म हे अभिनेत्यांसाठी एक माध्यम आहे की नाही? या प्रश्नाचं उत्तर देताना कंगनाने या प्लॅटफॉर्मची वस्तुस्थिती लोकांसमोर मांडली.‘तुम्ही ओटीटी प्लॅटफॉर्मची फार वेगळी प्रतिमा लोकांसमोर रंगवत आहात, त्यांची अवस्था वाटते तितकी चांगली नाही. कोविड काळात या प्लॅटफॉर्मची चलती होती, कारण बऱ्याच लोकांना हे एक उत्तम माध्यम आहे असं वाटत आहे.

# यामीच्या आर्टिकल 370’च्या कमाईत मोठी घट

बॉलीवूड अभिनेत्री यामी गौतम आपल्या अभिनयामुळे नेहमीच चर्चेत असते. आत्तापर्यंत तिने वेगवेगळ्या ढंगाच्या भूमिका साकारल्या आहेत. सध्या यामी तिच्या ‘आर्टिकल ३७०’ चित्रपटामुळे चर्चेत आहे. २३ फेब्रुवारीला हा चित्रपट प्रदर्शित झाला. चित्रपटाच्या घोषणेपासूनच या चित्रपटाबाबत प्रेक्षकांच्या मनात उत्सुक्ता निर्माण झाली होती.



सुरुवातीला प्रेक्षकांकडून या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळताना दिसत होता. मात्र, हळूहळू या चित्रपटाच्या कमाईत घट होताना दिसून येत आहे. दरम्यान या चित्रपटाच्या चौथ्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहेत.‘सॅकनिल्क’च्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, ‘आर्टिकल ३७०’ने पहिल्याच दिवशी ५.९ कोटी रुपयांची कमाई केली होती. त्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी चित्रपटाच्या कमाईत वाढ झाल्याचे बघायला मिळाले. चित्रपटाने दुसऱ्या दिवशी ७.४ कोटी व तिसऱ्या दिवशी ९.६ कोटी रुपयांची कमाई केली होती. मात्र, चौथ्या दिवशी चित्रपटाच्या कमाईत घट झाल्याचे दिसून आले. चौथ्या दिवशी चित्रपटाने केवळ ३.२५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. चार दिवसांमध्ये या चित्रपटाने भारतात २६.१५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. जगभरात या चित्रपटाने ३४ कोटींचा गल्ला जमविला आहे. यामी गौतमच्या ‘आर्टिकल ३७०’वर आखाती देशांमध्ये बंदी घालण्यात आली आहे.

# ॲनिमल’मधील पात्राबद्दल बॉबी देओल स्पष्टच बोलला

रणबीर कपूरच्या ‘ॲनिमल’ चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक सिनेमागृहांबाहेर गर्दी केली. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने तब्बल ९०० कोटींहून अधिक कमाई केली. चित्रपटात दाखवलेल्या बऱ्याच दृश्यांवरुन वाद निर्माण झाला. चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांच्यावरही प्रचंड टीका झाली. सामान्य प्रेक्षकांपासून सेलिब्रिटीजपर्यंत कित्येकांनी या चित्रपटावर भाष्य केलं. बॉबी देओलने या चित्रपटातून दमदार कमबॅक केलं.बॉबीने यात खलनायक अब्रार हक हे पात्र साकारलं. नुकताच बॉबीला या चित्रपटासाठी उत्कृष्ट खलनायकाचा दादासाहेब फाळके पुरस्कारही मिळाला. बॉबीने साकारलेलं हे पात्र फारच क्रूर, हिंसक दाखवल्याने त्याच्या या पात्रावरही टीका झाली. काहींना बॉबीचं हे पात्र फार आवडलं तर काहींना ते अजिबात पटलं नाही. ‘झी सिने अवॉर्ड २०२४’च्या पत्रकार परिषदेदरम्यान बॉबीने पत्रकारांशी संवाद साधतांना त्याच्या या पात्राबद्दल भाष्य केलं. बॉबी म्हणाला, “मला अशाच आव्हानात्मक भूमिका करायच्या आहेत, ज्या साकारताना माझ्यातील अभिनय कौशल्याचा कस लागेल. सकारात्मक भूमिका आणि नकारात्मक भूमिका असं काहीच नसतं. पूर्वी कॉमेडीयन, व्हिलन आणि हीरो असं विभाजन केलं जायचं, पण आता तसं राहिलेलं नाही. काळानुसार चित्रपट, कथा सादर करायची पद्धत बदलली आहे.” आपल्या पात्राबद्दल मिळणाऱ्या संमिश्र प्रतिक्रियांबद्दल बॉबी म्हणाला, “माझ्यासाठी ही नकारात्मक भूमिका पेलणं हे एक मोठं आव्हानच होतं. आपल्या सगळ्यांमध्ये अशा काही वाईट गोष्टी आहेत अन् जेव्हा आपण त्यावर मात करतो तेव्हाच आपण एक चांगला माणूस म्हणून घडतो. यासाठी अशा नकारात्मक पात्रांची फार मदत होते. चित्रपटातील माझं पात्र अब्रार असा का झाला यामागेही काही ठोस कारणं आहेत. मी जेव्हा ते पात्र साकारलं तेव्हा मी ते नकारात्मक आहे किंवा खलनायक आहे असा विचार केला नाही, ते पात्र त्याच्या कुटुंबाचा हीरो आहे अशाच दृष्टीने मी त्याकडे पाहिलं.”मध्यंतरी ‘ॲनिमल’चे मार्केटिंग डायरेक्टर वरुण गुप्ता यांनी ‘झुम’शी संवाद साधताना अब्रार हकच्या स्पिन ऑफ चित्रपटाबद्दल भाष्य केलं होतं. खास बॉबीसाठी त्याचं कथानक सादर करणारा एक स्वतंत्र चित्रपट येणार असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

# मुंबई-बडोदाचा सामना अनिर्णीत!

## अय्यर मुंबईकडून उपांत्य फेरी खेळण्यासाठी उपलब्ध

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**टीम इंडियाचा फलंदाज श्रेयस अय्यरने आणखी एक यू-टर्न घेतला आहे. श्रेयस अय्यर आता रणजी ट्रॉफीच्या सेमीफायनल मॅचमध्ये मुंबईकडून खेळताना दिसणार आहे. श्रेयस अय्यरने उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी स्वत:ला उपलब्ध घोषित केल्याची माहिती मुंबई क्रिकेट असोसिएशनने दिली आहे. मात्र, याआधी श्रेयस अय्यरने उपांत्यपूर्व फेरीसाठी स्वत:ला फिट नसल्याचे घोषित केले होते. मात्र, राष्ट्रीय क्रिकेट अकादमीने अय्यर खेळण्यासाठी तंदुरुस्त असल्याचे स्पष्ट केले होते.**



२ मार्चपासून सुरू होणाऱ्या उपांत्य फेरीत मुंबईचा सामना तामिळनाडूशी होणार आहे. टाईम्स ऑफ इंडियाने एमसीएच्या हवाल्याने म्हटले आहे की, “श्रेयस अय्यरने मुंबई क्रिकेट असोसिएशनला कळवले आहे की, तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे. तसेच तो उपांत्य फेरीचा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरेल.”यापूर्वी श्रेयस अय्यरला इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडियात स्थान मिळाले होते. पण अय्यरला दोन कसोटीत एकही अर्धशतक करता आले नाही. अय्यरने पहिल्या दोन कसोटीत ३५, १३, २७ आणि २९ धावा केल्या. यानंतर अय्यरला संघातून वगळण्यात आले. मात्र, दुखापतीमुळे अय्यर बाहेर असल्याच्या बातम्याही आल्या होत्या. पण नंतर अय्यर पूर्णपणे तंदुरुस्त असल्याचे स्पष्ट झाले आणि त्याला संघातून वगळण्यात आले. यानंतर बीसीसीआयने स्पष्ट केले होते की, जे खेळाडू इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेचा भाग नाहीत, त्या सर्व खेळाडूंनी रणजी ट्रॉफी खेळावी.दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात मुंबई आणि बडोदा आमनेसामने आले होते. मंगळवारी हा सामना अनिर्णात राहिल्याने मुंबई संघाने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या सामन्यात मुंबई संघाने पहिल्या डावात ३८४ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये मुशीर खानने २०३ धावांची खेळी साकारली होती. प्रत्युत्तरात बडोदा संघाने ३४८ धावा केल्या होत्या. त्यानंतर मुंबईने दुसऱ्या डावात हार्दिक तामोरे, तुषार देशपांडे आणि तनुष कोटियनच्या शतकाच्या जोरावर ५६९ धावा केल्या. यानंतर पहिल्या डावातील आघाडी मिळवून बडोद्यासमोर ६०६ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. परंतु प्रत्युत्तरात बडोद्याने ३ बाद १२१ धावा केल्या आणि सामना अनिर्णीत राहिला आणि मुंबई संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला. पहिल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात विदर्भने कर्नाटकवर १२७ धावांनी विजय मिळवला आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला. या सामन्यात विदर्भने कर्नाटकसमोरविजयासाठी ३७१ धावांच्या विशाल लक्ष्य ठेवले होते. मात्र, कर्नाटकचा संघ ६२.४ षटकांत २४२ धावांवर गारद झाला. लक्ष्याचा पाठलाग करताना. मयंक अग्रवालने ७० आणि अनीस केव्हीने ४० धावांचे योगदान दिले. विदर्भाकडून गोलंदाजी करताना आदित्य सरवटे आणि हर्ष दुबे यांनी प्रत्येकी चार विकेट्स घेतल्या. आता उपांत्य फेरीत विदर्भासमोर मध्य प्रदेशचे आव्हान असणार आहे.दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात मुंबई आणि बडोदा आमनेसामने आले होते. मंगळवारी हा सामना अनिर्णात राहिल्याने मुंबई संघाने उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

### अय्यरच्या बाबतीत झाला वाद

२ मार्चपासून सुरू होणाऱ्या उपांत्य फेरीत मुंबईचा सामना तामिळनाडूशी होणार आहे. टाईम्स ऑफ इंडियाने एमसीएच्या हवाल्याने म्हटले आहे की, “श्रेयस अय्यरने मुंबई क्रिकेट असोसिएशनला कळवले आहे की, तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे. तसेच तो उपांत्य फेरीचा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरेल.”यापूर्वी श्रेयस अय्यरला इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडियात स्थान मिळाले होते. पण अय्यरला दोन कसोटीत एकही अर्धशतक करता आले नाही. अय्यरने पहिल्या दोन कसोटीत ३५, १३, २७ आणि २९ धावा केल्या. यानंतर अय्यरला संघातून वगळण्यात आले. मात्र, दुखापतीमुळे अय्यर बाहेर असल्याच्या बातम्याही आल्या होत्या. पण नंतर अय्यर पूर्णपणे तंदुरुस्त असल्याचे स्पष्ट झाले आणि त्याला संघातून वगळण्यात आले. यानंतर बीसीसीआयने स्पष्ट केले होते की, जे खेळाडू इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेचा भाग नाहीत, त्या सर्व खेळाडूंनी रणजी ट्रॉफी खेळावी.दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात मुंबई आणि बडोदा आमनेसामने आले होते. मंगळवारी हा सामना अनिर्णात राहिल्याने मुंबई संघाने उपांत्य फेरीत धडक मारली आहे.ज्यामध्ये मुशीर खानने २०३ धावांची खेळी साकारली होती. प्रत्युत्तरात बडोदा संघाने ३४८ धावा केल्या होत्या.

# नामिबियाच्या फलंदाजांने झळकावले वेगवान शतक

## नामिबियाच्या फलंदाजांने पाडला चौकार-षटकारांचा पाऊस

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये आज सर्वात वेगवान शतकाची नोंद झाली आहे. नेपाळ टी-२० तिरंगी मालिकेत नामिबियाचा फलंदाज जॅन निकोल लॉफ्टी ईटनने नेपाळविरुद्ध अवघ्या ३३ चेंडूत शतक झळकावून इतिहास रचला. आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये सर्वात जलद शतक झळकावणारा तो फलंदाज ठरला. गेल्या वर्षी मंगोलियाविरुद्ध आशियाई क्रीडा स्पर्धेत ३४ चेंडूत शतक झळकावणारा नेपाळचा क्रिकेटपटू कुसल मल्लाचा विक्रम त्याने मोडला.**



जॅन निकोल लॉफ्टी ईटनने ३६ चेंडूत ११ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने १०१ धावा केल्या. त्याच्या खेळीमुळे नामिबियाने २० षटकांत ४ गडी गमावून २०६ धावा केल्या. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४० पेक्षा कमी चेंडूत शतक झळकावणारा जॅन निकोल लॉफ्टी इटन हा सातवा फलंदाज ठरला. गेल्या वर्षी आशियाई क्रीडा स्पर्धेत शतक झळकावून कुशल मल्लाने दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज डेव्हिड मिलर, टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा आणि चेक प्रजासत्ताकचा सुदेश विक्रमसेकेरा यांचा विक्रम मोडीत काढला होता. ज्यांनी ३५-३५ चेंडूत शतकं ठोकली होती.जॅन निकोल लॉफ्टी ईटनने १८ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर पुढील ५० धावा करण्यासाठी फक्त १५ चेंडू लागले. २०व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर तो बाद झाला. अविनाश बोहराच्या चेंडूवर गुलसन झाने त्याचा झेल घेतला. तो ११ व्या षटकात जेव्हा फलंदाजीला आला होता, तेव्हा नामिबियाची धावसंख्या ३ विकेट्स ६२ धावा अशी होती. यानंतर जॅन निकोल लॉफ्टी ईटनने या डावात २८०.५६ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या. त्याने मलान क्रुगरच्या साथीने त्याने चौथ्या विकेटसाठी ५२ चेंडूत १३५ धावा जोडून नामिबियाची धावसंख्या ४ बाद २०६ धावांपर्यंत पोहोचवली.

### नामिबियाने 20 धावांनी सामना जिंकला

सलामीवीर क्रुगर ४८ चेंडूत ५९ धावा करून नाबाद राहिला, तर ३३ चेंडूत शतक झळकावणाऱ्या जॅनला बोहराने बाद केले. दुसरीकडे, लॅफी-ईटनने गोलंदाजीतही अप्रतिम कामगिरी केली आणि तीन षटकांत २९ धावांत २ बळी घेतले. ज्यामुळे प्रत्युतरात नेपाळचा डाव १९ व्या षटकात १८६ धावांवर संपुष्टात आला. अशा प्रकारे नामिबियाने २० धावांनी सामना जिंकला.तिरंगी मालिकेत नामिबियाचा फलंदाज जॅन निकोल लॉफ्टी ईटनने नेपाळविरुद्ध अवघ्या ३३ चेंडूत शतक झळकावून इतिहास रचला. आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये सर्वात जलद शतक झळकावणारा तो फलंदाज ठरला. गेल्या वर्षी मंगोलियाविरुद्ध आशियाई क्रीडा स्पर्धेत ३४ चेंडूत शतक झळकावणारा नेपाळचा क्रिकेटपटू कुसल मल्लाचा विक्रम त्याने मोडला.